म.वि.स./क-१ (आस्थापना)

दि. २ सप्टेंबर, २०२०

महाराष्ट्र राज्यातील कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लागू करण्यात आलेल्या लॉक डाऊनच्या कालावधीतील मर्यादित उपस्थितीसंदर्भात महाराष्ट्र महसूल व वन, पुर्नविसन शासन परिपत्रक क्र.डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम/१, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० रोजी निर्गमित केलेले परिपत्रक.

उपरोक्त शासन निणर्यानुसार लॉक डाऊनचा कालावधी दिनांक ३० सप्टेंबर, २०२० पर्यंत वाढविण्यात आला असल्याने कोरोना विषाणूचा प्रसार व संसर्ग रोखण्यासाठी या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती उपरोक्त शासन निर्णयानुसार मर्यादित ठेवणे आवश्यक आहे.

त्याप्रमाणे पुढीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे :-

**१) या सचिवालयातील गट-अ व गट-ब अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती बुधवार, दिनांक २ सप्टेंबर, २०२० ते बुधवार, दिनांक ३० सप्टेंबर, २०२० पर्यंत १००% प्रमाणे राहील.**

**२) या सचिवालयातील गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती बुधवार, दिनांक २ सप्टेंबर, २०२० ते बुधवार, दिनांक ३० सप्टेंबर, २०२० पर्यंत ३०% प्रमाणे राहील.**

**३) आगामी पावसाळी अधिवेशन सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजीपासून सुरु होणार असल्याने, अधिवेशनाच्या कामकाजाची तातडी व निकड लक्षात घेता, या सचिवालयातील गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती या सचिवालयाचे आदेश क्र.११७३०/क-१, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० रोजीच्या आदेशात नमूद केलेल्या कक्षातील उपस्थिती अधिवेशन कालावधीपुरतीच १००% प्रमाणे राहील.**

**४) सचिवालयाचे आदेश क्र.११७३०/क-१, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० रोजीच्या आदेशात नमूद केलेले कक्ष वगळता बुधवार, दिनांक २ सप्टेंबर, २०२० ते बुधवार, दिनांक ३० सप्टेंबर, २०२० पर्यंत ३० टक्के प्रमाणे उपस्थितीचे नियोजन करुन संबंधित कक्षाच्या अवर सचिव / अवर सचिव (समिती) / कक्ष अधिकारी यांनी उप सचिवांना अवगत करावे.**

...२/-